प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA

संचार विभाग, केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

डिसेंबर 4, 2015

**'R' ह्या इनसेट अक्षरासह आरबीआय रु.500 च्या नोटा देणार**

भारतीय रिझर्व बँक लवकरच, महात्मा गांधी मालिका-2005 मधील रु.500 च्या नोटांमध्ये दोन्हीही अंक फलकात **'R'** हे अक्षर समाविष्ट करणार आहे. ह्या नोटांवर, रिझर्व बँकेचे गव्हर्नर, डॉ. रघुरामजी राजन ह्यांची सही व मागील बाजूवर '2015' हे छपाईचे वर्ष छापलेले असेल. देण्यात येणा-या ह्या नोटांचे डिझाईन, अंक फलकात चढत्या आकाराचे अंक, ब्लीड लाईन्स, व मागील बाजूवरील मोठी केलेली ओळख-खूण ह्या अतिरिक्त लक्षणांसह, महात्मा गांधी मालिका-2005 मधील रु.500 च्या नोटांप्रमाणेच असेल. ह्या लक्षणांनी युक्त असलेल्या नोटा सर्वप्रथम सप्टेंबर 2015 मध्ये प्रसृत केल्या गेल्या होत्या.

रिझर्व बँकेने पूर्वी दिलेल्या रु.500 च्या नोटा, वैध चलन म्हणून असणे सुरुच राहील.

**अजित प्रसाद**

सहाय्यक महाव्यवस्थापक

**वृत्तपत्र निवेदन : 2015-2016/1317**